जा.क्र. स्थागुअशा/प्रेस नोट/ 3321 /2020
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग
दिनांक- 20.10.2020

---// **प्रेस नोट** //---

## बोलेरो पिकअप मालवाहक वाहनाचे चोरीचा पर्दाफाश

दिनांक 10.11.2020 रोजी 15:00 वा. ते दिनांक 12.11.2020 रोजी सकाळी 09:00 वाजताचे मुदतीत फिर्यादी श्री.गंगाराम शिवा रेडकर, वय-36, रा.झाराप, ता.कुडाळ यांचे मालकीची बोलेरो पिकअप मालवाहक गाडी क्रमांक MH-07-P-2611 ही कोणीतरी अज्ञात चोरट्याने बालाजी मार्बल, कुडाळ येथून चोरुन नेलेली होती. सदर बाबत कुडाळ पोलीस ठाणे गु.र.नं.224/2020, भा.दं.वि. कलम 379 नुसार दि.12.11.2020 रोजी 17:11 वाजता गुन्हा दाखल आहे.

सदर वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने श्री.राजेंद्र दाभाडे, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग, श्री.तुषार पाटील, अपर पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग, श्री.सुनिल धनावडे, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांनी श्री.सचिन शेळके, पोलीस उपनिरीक्षक, स्थागुअशा यांचे नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार श्री.रामचंद्र शेळके, श्री.गुरुनाथ कोयंडे, श्री.कृष्णा केसरकर, श्री.संकेत खाडये, श्री.रवि इंगळे, श्री. प्रथमेश गावडे अशांचे तपास पथक नियुक्त केलेले होते.

सदर तपास पथकाने चोरीस गेलेले वाहन व चोरट्याबाबत सखोल चौकशी करुन माहीती घेतली.प्राप्त माहीतीमध्ये बोलेरो पिकअप वाहन चोरीसाठी आरोपीनी इंडीका गाडी क्रमांक. MH-03-AF-8317 चा वापर केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार सदर इंडीका कारचा शोध घेऊन इंडीका कार व एका संशयित आरोपीस कोल्हापुर येथुन अटक केलेली होती. परंतु चोरीस गेलेली बोलेरो पिकअप व मुख्य आरोपीताचा काहीही सुगावा लागत नव्हता. तरीपण तपास पथकाने हार न मानता अविरत तपास सुरू ठेवलेला होता. त्यामध्ये एका संशयीत आरोपीजवळ चोरीची बोलेरो पिकअप गाडी असले बाबत माहीती मिळाली. त्यानुसार तपास पथकाने कोल्हापूर व आजुबाजुचे भागात चोरीस गेलेली बोलेरो पिकअप व चोरट्यांचा शोध तपास सुरू केला. शिवाय निष्फन्न झालेल्या आरोपींचा पुर्व इतीहास तपासला असता चोरट्यावर यापुर्वी वाहन चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे समजले. मुदतीत सिंधुदुर्ग पोलीसांचे तपास पथक आपल्या मागावर असुन आपला शोध घेत असल्याचा सुगावा आरोपीस लागल्याने त्यांने चोरीच्या वाहनासह रत्नागिरी जिल्ह्यात पलायन करुन रत्नागिरी जिल्ह्यातील पाली या गावात एका हायस्कूल समोरील मैदानावर चोरीचे वाहन बेवारस स्थितीत सोडून तेथून तो पळून गेला. ही बाब तपास पथकास कळताच रात्रीच सिंधुदुर्ग पोलीसांचे तपास पथकाने पाली, जिल्हा-रत्नागिरी गाठुन चोरीस गेलेली बोलेरो पिकअप मालवाहक गाडी क्रमांक MH-07-P-2611 ही हस्तगत केलेली आहे.

एकंदरीत सदरचा गुन्हा उघडकीस आणणे हे कौशल्याचे व जिकरीचे काम होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील पथकाने अथक व अविरत परिश्रम करुन चोरीस गेलेली बोलेरो पिकअप हस्तगत करुन आरोपी निष्पन्न केलेले आहेत. त्यामुळे फिर्यादी श्री.गंगाराम शिवा रेडकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाचे कामगिरी विषयी समाधान व्यक्त करुन तपास पथकाचे कौतुकही केलेले आहे.

वाहन चोरीचे गुन्ह्यात सहभागी असलेल्या आरोपींविरुध्द यापुर्वी बाहेरील जिल्ह्यात बरेच वाहन चोरीचे गुन्हे दाखल असून चोरटे हे सराईत आहेत. त्यांचेकडून सिंधुदुर्ग जिल्ह्यात यापुर्वी चोरीस गेलेल्या वाहनांचे इतर गुन्हेही उघडकीस येण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा तपास करीत आहे.

( सुनिल धनावडे )
पोलीस निरीक्षक, स्थागुअशा सिंधुदुर्ग
पोलीस अधीक्षक, कार्यालय सिंधुदुर्ग

प्रति,

जिल्हा माहीती अधिकारी, सिंधुदुर्ग